कुक्कुटपालनासाठी वापरल्या जाणा-या
जमिनीसाठी बिनशेती परवानगी घेणेबाबत.

महाराष्ट्र शासन,
महसूल व वन विभाग,
शासन परिपत्रक अनअपी १०८९/५४२३/[१२] ल-२
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १० सप्टेंबर, १९९०

संदर्भ : शासन निर्णय, महसूल व वन विभाग क्रमांक एनएए १०८८/२७७८८/ [९५] ल-२, दिनांक ८-११-१९८८.

परिपत्रक :

वर संदर्भामध्ये नमूद शासन निर्णयानुसार राज्यातील कुक्कुटपालनाच्या व्यवसायासाठी वापरण्यात येणा-या जमिनीवर सदर शासन निर्णयाच्या तारखेपासून अकृषिक आकारणी लागू करण्यात येऊ नये असे आदेश निर्गमीत करण्यात आले आहेत.

२. सदर सवलत जाहीर केल्यानंतर असा विचारप्रवाह सुरु झाला की, जर अकृषिक आकारणी करण्याची आवश्यकता नसेल तर कुक्कुटपालन व्यवसायाकरिताच्या बांधकामाला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ च्या परवानगीची आवश्यकता नाही. याबाबत जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रकर्षाने असे प्रतिपादन केले की, अशा बांधकामाला नगर नियोजनाचे अनुषंगाने महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ अंतर्गत परवानगी आवश्यक असावी.

३. ही बाब शासनाने सविस्तरपणे तपासली असून शासन या परिपत्रकाने असे निर्देश देत आहे की, कुक्कुटपालन व्यवसायाखालील क्षेत्रास अकृषिक आकारणीतून सूट देण्यात आली असली तरीही अशा व्यवसायांतर्गतचे बांधकामाला महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम, १९६६ च्या कलम ४४ व त्याखालील महाराष्ट्र जमीन महसूल [जमिनीच्या वापरात बदल व अकृषिक आकारणी] नियम १९६९ च्या तरतुदी लागू असून उक्त नियमातील नियम ४ [ई] च्या तरतुदींचा अवलंब काटेकोरपणे करण्यात यावा. तसेच, संबंधित

कृ. मा. प.

जिल्हाधिकारी कार्यालय, रत्नागिरी
17 SEP 1990
शाखा -

LND-II अत्यंत महत्वाचे सर्वांना कळवावे
११३९

कुक्कुटपालन व्यवसायाअंतर्गत बांधकाम हे त्याच कारणासाठी असल्याची खात्री करून घेण्यासाठी अशा अर्जदारांना जिल्हा उपसंचालक, पशुसंवर्धन यांचेकडून सदर वापराखाली नेमके किती क्षेत्र अंतर्भूत राहील याच्या माहितीसह ना हरकत प्रमाणपत्र प्राप्त करून सादर करणे बंधनकारक राहील.

४. सदर परिपत्रक, नगर विकास विभाग व पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग यांच्या सहमतीने निर्गमीत करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[ त्रि. शं. कर्वे ]
कार्यासन अधिकारी,
महसूल व वन विभाग.

१] सर्व विभागीय आयुक्त.

२] सर्व जिल्हाधिकारी.

३] सर्व जिल्हा उपसंचालक, पशुसंवर्धन.

४] महालेखापाल, महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर.

५] नगर विकास विभाग.

६] पशुसंवर्धन, दुग्धविकास व मत्स्यव्यवसाय विभाग.

७] वित्त विभाग.

८] महसूल व वन विभाग, ल-२ कार्यासन, निवड नस्ती.

९] महसूल व वन विभाग, ज-१, टी-२, टी-३ कार्यासने आणि इतर सर्व "ज" कार्यासने.

क्रमांक कार्या- ५- २-४ जमिन (१) रेक्डो १६७२
जिल्हाधिकारी यांचे कार्यालय,
रत्नागिरी १९-१०-१९९२.

प्रत : माहितीसाठी रवाना.